INDIA PARTNER Dabur GROUP

# अविवा न्यू फॅमिली इन्कम बिल्डर



AVIVA | Life Insurance |



**अविवा न्यू फॅमिली इन्कम बिल्डर - ही एक व्यक्तिगत नॉन-लिंक्ड असहभागी बचत जीवन विमा योजना आहे.**

तुमच्या प्रिय व्यक्तींना आज आणि भविष्यात अगदी आरामशीर जीवन देण्यासाठी तुम्ही करत असलेले प्रयत्न आणि कठोर मेहनत आम्हाला माहित आहे. सादर आहे अविवा न्यू फॅमिली इन्कम बिल्डर, बचत तथा संरक्षण देणारी योजना जी तुम्हाला 12 वर्ष नियमित पेआऊटसच्या स्वरुपात खात्रीशीर परतावा देऊन तुम्हाला आर्थिक बाबतीत सहाय्य करते. तुमचा अकाली मृत्यू झाल्यास, हे नियमित पेआऊटस तुमच्या परिवाराला दिले जातात. यामुळे तुम्ही अस्तित्वात नसताना देखील तुम्ही त्यांना तशीच जीवनशैली देणे सुरू ठेवाल याची काळजी घेतली जाते.

## अविवा न्यू फॅमिली इन्कम बिल्डर -खास आकर्षणे

- **स्वत:साठी खात्रीशीर मिळकत**
  - 12 वर्ष दर वर्षी वार्षिक हप्ता भरा आणि खालील पद्धतीने पुढील 12 वर्ष भरलेल्या हप्त्याच्या दुप्पट रक्कम मिळवा:
    - 13व्या वर्षापासून ते 24व्या वर्षापर्यंत प्रत्येक वर्षाच्या अखेरीस वार्षिकीकृत हप्त्याच्या 1.5 पट
    - 24व्या वर्षाच्या अखेरीस शेवटच्या वार्षिक पेआऊटच्या सोबत वार्षिकीकृत हप्त्याच्या 6 पट अधिक लाभ देय
    - त्याचबरोबर, प्रवेशाचे वेळी तुमच्या वयानुसार, 12 वर्षाच्या हप्ता भरणा कालावधीच्या अखेरीस तुम्हाला खात्रीशीर अंतरिम लाभ देखील मिळेल.
- **तुमचा मृत्यू झाल्यास तुमच्या कुटुंबाला मिळेल खात्रीशीर मिळकत**
  - पॉलिसीच्या कालावधी दरम्यान मृत्यू झाल्यास, वार्षिकीकृत हप्त्याच्या 1.5 पट इतके 12 नियमित वार्षिक हप्ते देय असतील, व त्यातील पहिला हप्ता दाव्याचे निराकरण करताना देण्यात येईल आणि बाकीचे 11 वार्षिक हप्ते दर वर्षी विमाधारकाच्या मृत्यूच्या तारखेला देय असतील.
  - शेवटच्या वार्षिक हप्त्यासोबत ''वार्षिकीकृत हप्त्याच्या 6 पट'' इतका अधिक लाभ देय असेल.
  - त्याचबरोबर, तुमच्या नामनिर्देशित व्यक्तीला पहिल्या पेआऊटसोबत खात्रीशीर अंतरिम लाभ देखील देण्यात येईल.

## अविवा न्यू फॅमिली इन्कम बिल्डर - पात्रता

| मापदंड | निकष | |
|---|---|---|
| प्रवेशाचे वेळी वय | 6 ते 50 वर्ष मागील वाढदिवसाला | |
| परिपक्वता वय | 18 ते 62 वर्ष मागील वाढदिवसाला | |
| पॉलिसीची मुदत | 12 वर्ष | |
| हप्ता भरणा कालावधी | 12 वर्ष | |
| पेआऊट कालावधी | परिपक्वतेनंतर 12 वर्ष म्हणजे 13 पासून ते 24 वर्ष पर्यंत | |
| वार्षिकीकृत हप्ता (किमान) | ₹40,000 | |
| वार्षिकीकृत हप्ता (कमाल) | ₹1,00,00,000 (एका जीवनासाठी) | |
| हमी रक्कम (सम अ‍ॅशूअर्ड) | **हमी रक्कम ही तुमच्या वार्षिकीकृत हप्त्याच्या 24 पट आहे** | |
| | **किमान हमी रक्कम** | **कमाल हमी रक्कम** |
| | ₹9,60,000 (किमान वार्षिकीकृत हप्ता (₹40,000 X 24) | ₹24,00,00,000 एका जीवनासाठी (कमाल वार्षिकीकृत हप्ता (₹1,00,00,000 X 24जे मडंळाने मंजूर केलेल्या विमालेखनाच्या पॉलिसीच्या अधीन असेल |
| हप्ता भरण वारंवारिता | फक्त वार्षिक | |

**कृपया नोंद घ्या:**

1. ''वार्षिकीकृत हप्ता म्हणजे पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्ताची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते, करारानुसार अतिरिक्त हप्ते आणि मोडल हप्तेसाठी अधिभार, काही असल्यास.
2. सरकारद्वारा वेळोवेळी दिलेल्या अधिसूचनांनुसार वस्तू व सेवा कर, उपकर लागू असेल त्याप्रमाणे, यांच्या समावेशासह परंतु त्यास तितकीच मर्यादा नसलेले, कर देखील आकारण्यात येतील.कर कायद्यात बदल होऊ शकतात.
3. लागू हप्त्याहून अधिक मागील तारखेच्या कालावधीसाठी द.सा. 9% दराने मासिक चक्रवाढ पद्धतीने व्याज भरल्यास चालू आर्थिक वर्षातील मागच्या तारखेची पॉलिसी घेता येईल.
4. पॉलिसीच्या सुरुवातीला विमाधारक अल्पवयीन असल्यास:
   - पॉलिसीधारकाला हप्त्याचे पैसे भरावे लागतील जो एकतर विमाधारकाचे आईवडिल किंवा आजीआजोबा किंवा पालक असेल. हप्ता भरणा मुदत संपण्यापुर्वी पॉलिसीधारकाचा मृत्यू झाल्यास, भविष्यातील हप्ते विमाधारकाचे जिवंत असलेले आईवडिल/कायदेशिर पालक भरु शकतील. भविष्यातील हप्ते न भरल्यास, रद्द/भरणा केलेली तरतूद लागू होईल.
   - पॉलिसीच्या प्रारंभाच्या तारखेला जोखीम सुरु होईल.
   - विमाधारक अल्पवयीन असताना पॉलिसीधारकाचा मृत्यू झाल्यास, विमाधारकाचे जिवंत असलेले आईवडिल/कायदेशिर पालक यांनी दावा दाखल केल्यास आणि दस्तऐवजांचा पुरावा सादर केल्यास, हे विमाधारक म्हणून गृहित धरता येतील. विमाधारकाचे वय 18 वर्ष पूर्ण झाल्यावर मागील वाढदिवसाला पॉलिसी विमाधारकाच्या नावे होईल.

## अविवा न्यू फॅमिली इन्कम बिल्डर - योजनेचे फायदे

**परिपक्वता लाभ**

विमाधारक पॉलिसीच्या अखेरपर्यंत जिवंत राहिल्यास आणि सर्व देय हप्ते भरले असल्यास खालील पद्धतीने परिपक्वता हमी रक्कम देण्यात येईल.


- पेआऊट कालावधीत प्रत्येक वर्षाच्या अखेरीस ''वार्षिकीकृत हप्त्याच्या 1.5 पट'' इतके 12 वार्षिक हप्ते देण्यात येतील.
- पेआऊटच्या कालावधीच्या अखेरीस ''वार्षिकीकृत हप्त्याच्या 6 पट'' इतकी ठोस रक्कम देण्यात येईल.

''वार्षिकीकृत हप्ता'' म्हणजे पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्ताची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते, करारानुसार अतिरिक्त हप्ते आणि मोडल हप्तेसाठी अधिभार, काही असल्यास.

हप्ता भरणा कालावधीच्या अखेरीस प्रवेशाचे वेळी वयानुसार अतिरिक्त खात्रीशीर अंतरिम लाभ देण्यात येईल.

नियमित मिळकत घेत असताना विमाधारकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास, नामनिर्देशित व्यक्तीला/लाभधारकाला थकित नियमित पेआऊटसचे पैसे देण्यात येतील.

**उदाहरण:** तुमचे वय 35 वर्ष आहे आणि तुम्ही 12 वर्ष दरवर्षी ₹1 लाख + लागू कर इतकी रक्कम भरली. तुम्हाला 12व्या वर्षाच्या अखेरीस ₹8000/- इतका खात्रीशीर अंतरिम लाभ आणि 13व्या वर्षापासून ते 24व्या वर्षापर्यंत पुढील 12 वर्ष प्रत्येक वर्षाच्या अखेरीस नियमित मिळकतीच्या स्वरुपात ₹1.5 लाख इतकी रक्कम मिळेल आणि 24व्या वर्षाच्या अखेरीस शेवटच्या पेआऊटसोबत ₹6 लाख इतका वाढीव लाभ देय असेल.



**मृत्यू लाभ**

पॉलिसीच्या कालावधी दरम्यान विमाधारकाचा मृत्यू झाल्यास, मृत्यूच्या तारखेपर्यंत सर्व देय हप्ते भरले असल्यास देय मृत्यूसमयी हमी रक्कम ही ह्यापैकी जी अधिक असेल तितकी असेल:

a) वार्षिकीकृत हप्त्याच्या 10 पट, किंवा

b) मृत्यूच्या तारखेपर्यंत एकुण भरलेल्या हप्त्याच्या 105%, किंवा

c) पॉलिसीची हमी रक्कम

एकुण भरलेल्या हप्ते म्हणजे सर्व मिळालेल्या हप्त्यांची एकुण बेरीज, वजा अतिरिक्त हप्ता, रायडर हप्ता आणि कर, काही असल्यास.

हमी रक्कम खालील प्रमाणे देय असेल:

- ''वार्षिकीकृत हप्त्याच्या 1.5 पट'' इतक्या रकमेचे 12 नियमित वार्षिक हप्ते देण्यात येतील. दावा निराकरणाच्या वेळी पहिला हप्ता देण्यात येईल आणि बाकीचे 11 वार्षिक हप्ते विमाधारकाच्या दर वर्षी येणाऱ्या मृत्यूच्या तारखेला देण्यात येईल व ज्याची सुरुवात पहिल्या वर्षाच्या मृत्यूच्या तारखेपासून सुरु होईल.
- ''वार्षिकीकृत हप्त्याच्या 6 पट'' इतकी ठोस रक्कम विमाधारकाच्या मृत्यूच्या 11 व्या वर्धापनदिनाला 12व्या वार्षिक हप्त्यासोबत देण्यात येईल.

''वार्षिकीकृत हप्ता'' म्हणजे पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्ताची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते, करारानुसार अतिरिक्त हप्ते आणि मोडल हप्तेसाठी अधिभार, काही असल्यास.

मृत्यूच्या दाव्याचे निराकरण करण्याच्या वेळी प्रवेशाचे वेळी तुमच्या असलेल्या वयानुसार, अधिक खात्रीशीर अंतरिम लाभ देण्यात येईल.

**उदाहरण:**

विमाधारकाचा सहाव्या पॉलिसी वर्षात मृत्यू झाल्यास (पॉलिसीच्या प्रस्थापनेला 35 वर्ष वय)


- पॉलिसी जारी केल्याची तारीख: 1 नोव्हेंबर 2015
- पॉलिसीधारकाने 6 वर्ष वार्षिकीकृत हप्त्याच्या स्वरुपात ₹1 लाख अधिक कर इतकी रक्कम भरली आणि त्याचा 1 डिसेंबर 2020 रोजी मृत्यू झाला.
- जानेवारी 2021 रोजी त्याचा दावा स्वीकार झाला.
- नामनिर्देशित व्यक्तीला/लाभधारकाला हमी रक्कम मिळेल.

a. 1 जानेवारी' 21, रोजी ₹1.5 लाख अधिक ₹8,000 (खात्रीशीर अंतरिम लाभ)

b. पुढील 11वर्ष दर वर्षी 1 डिसेंबरला ₹1.5 लाख मिळतील.

c. ₹1.5 लाखाच्या 12व्या हप्त्यासोबत ₹6 लाख

त्यामुळे नामनिर्देशित व्यक्तीला/लाभधारकाला मिळणारे एकुण लाभाचे पेआऊट ₹24,08,000/- इतके असतील.




**खात्रीशीर अंतरिम लाभ**

मृत्यूच्या दाव्याच्या निराकरणाच्या वेळी किंवा हप्ता भरणा कालावधीच्या अखेरीस, ह्यापैकी जी लवकर असेल तेव्हा प्रवेशाचे वेळी वयानुसार खात्रीशीर अंतरिम लाभ देय असेल.

| प्रवेशाचे वेळी वयाचा टप्पा (वर्ष) | खात्रीशीर अंतरिम लाभ |
|---|---|
| 6-15 | वार्षिकीकृत हप्त्याच्या 12% |
| 16-25 | वार्षिकीकृत हप्त्याच्या 10% |
| 26-35 | वार्षिकीकृत हप्त्याच्या 8% |
| 36-40 | वार्षिकीकृत हप्त्याच्या 6% |
| 41-45 | वार्षिकीकृत हप्त्याच्या 4% |
| 46-50 | वार्षिकीकृत हप्त्याच्या 2% |

''वार्षिकीकृत हप्ता'' म्हणजे पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्ताची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते, करारानुसार अतिरिक्त हप्ते आणि मोडल हप्तेसाठी अधिभार, काही असल्यास.

**रद्द / पुनरुज्जीवन / सरेंडरची तरतूद**

**जर किमान 2 वर्षांच्या हप्ते भरल्या असल्यास**

- पहिल्या 2 वर्षांच्या दरम्यान, सवलत कालावधी पूर्ण होण्यापुर्वी देय हप्ता भरली नसल्यास, पॉलिसी रद्द होईल.
- पहिल्या न भरलेल्या हप्त्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या आत (पुनरुज्जीवन कालावधी) रद्द झालेली पॉलिसी पुनरुज्जीवित न केल्यास एकुण भरलेल्या हप्त्याच्या 30% रक्कम देऊन पॉलिसी खंडित होईल.
- रद्द पॉलिसी अंतर्गत, जर पुनरुज्जीवन कालावधीत मृत्यू झाल्यास, मृत्यूच्या तारखेपर्यंत भरलेल्या एकुण हप्त्याच्या 100% रक्कम परत करण्यात येईल आणि पॉलिसी खंडित होईल.
- इतर कोणतेही लाभ देय नसतील.

एकुण भरलेल्या हप्ते म्हणजे सर्व मिळालेल्या हप्त्यांची एकुण बेरीज, वजा अतिरिक्त हप्ता, रायडर हप्ता आणि कर, काही असल्यास.

**जर किमान दोन वर्षांचे हप्ता भरले असल्यास:**

किमान 2 वर्षाचे हप्ते भरल्यानंतर, जर त्यानंतर सवलत कालावधी संपण्यापुर्वी एखादी देय हप्ता भरली नाही :

- पॉलिसी पेड अप मूल्य धारण करेल.

$$\text{भरणा केलेली हमी रक्कम} = \frac{\text{एकुण भरलेल्या हप्त्यांची संख्या}}{\text{कंत्राटांतर्गत एकुण देय हप्त्यांची संख्या}} \times \text{मृत्यू समयी हमी रक्कम}$$

- **आंशिक कमी झालेला पेड-अप लाभ खालील पद्धतीने देय असेल.**

पॉलिसीच्या मुदतीमध्ये विमाधारकाचा मृत्यू झाल्यास, भरणा केलेली हमी रक्कम खालील पद्धतीने देय असेल:

- वार्षिकीकृत हप्त्याच्या ''1.5 X(भरलेल्या हप्त्यांची संख्या/12) पट इतके 12 नियमित वार्षिक'' हप्ते देण्यात येतील.
  - मृत्यूच्या दाव्याच्या निराकरणाच्या वेळी पहिला हप्ता अधिक खात्रीशीर अंतरिम लाभ X (एकुण भरलेल्या हप्त्यांची संख्या/12) देण्यात येईल.
  - बाकीचे 11 वार्षिक हप्ते दर वर्षी विमाधारकाच्या प्रत्येक मृत्यूच्या तारखेला देण्यात येतील व त्याची सुरुवात पहिल्या वर्षाच्या मृत्यूच्या तारखेला होईल.
- 12व्या वार्षिक हप्त्यासोबत ''वार्षिकीकृत हप्त्याच्या 6 X (एकुण भरलेले हप्ते /12) पट'' इतकी ठोस रक्कम देण्यात येईल.

विमाधारक परिपक्वतेपर्यंत जिवंत राहिल्यास, भरणा केलेली हमी रक्कम देय असेल.

- खात्रीशार अंतरिम लाभ X हप्ता भरणा कालावधीच्या अखेरीस (भरलेल्या हप्त्यांची संख्या/12).
- पेआऊट कालावधीत प्रत्येक वर्षाच्या अखेरीस "1.5-X वार्षिकीकृत हप्त्याच्या (भरलेल्या हप्त्यांची संख्या/12) पट'' इतके 12 नियमित वार्षिक हप्ते देण्यात येतील.
- पेआऊट कालावधीच्या अखेरीस ''6 X वार्षिकीकृत हप्त्याच्या (भरलेल्या हप्त्यांची संख्या/12) पट'' इतकी ठोस रक्कम देण्यात येईल.

''वार्षिकीकृत हप्ता'' म्हणजे पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्ताची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते, करारानुसार अतिरिक्त हप्ते आणि मोडल हप्तेसाठी अधिभार, काही असल्यास.

**पुनरुज्जीवन:**
पॉलिसीधारकापाशी रद्द/भरणा केलेली पॉलिसी पुनरुज्जीवित करण्यासाठी पहिल्या न भरलेल्या देय हप्त्याच्या तारखेपासून (FUP) पाच वर्षांचा कालावधी असेल. पॉलिसीधारकाला पुनरज्जीवन करण्याच्या रकमेनुसार कंपनीच्या मंडळाने मंजूर केलेल्या विमालेखन मार्गदर्शक प्रणालींनुसार कंपनीचे समाधान होईल अशा प्रकारे विमाधारकाचा विमायोग्यतेचा पुरावा सादर करावा लागेल आणि सर्व देय हप्ते व त्याचबरोबर पुनरुज्जीवन शुल्क व विलंब कालावधीसाठी न भरलेल्या हप्त्यांवर व्याज देय असेल. पुनरुज्जीवन शुल्क ₹250 अधिक कर, काही असल्यास, इतके असेल आणि व्याजाचा आकारण्यात येणारा दर दरसाल 9% मासिक चक्रवाढ दराने, अधिक कर काही असल्यास, इतका असेल. पॉलिसीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर भरणा केलेली पॉलिसी पुनरुज्जीवित करता येणार नाही.

## सरेंडर मूल्य (SV)

किमान दोन वर्षाच्या हप्ते भरल्यास कोणत्याही वेळी पॉलिसी सरेंडर करता येईल. देय सरेंडर मूल्य हे खात्रीशीर सरेंडर मूल्य आणि विशेष सरेंडर मूल्य ह्यापैकी जे अधिक असेल तितके असेल

- **खात्रीशीर सरेंडर मूल्य:**

छखात्रीशीर सरेंडर मूल्य इतके असेल:

| सरेंडर केल्याचे पॉलिसी वर्ष | खात्रीशीर सरेंडर मूल्य |
|---|---|
| 2nd | एकुण भरलेल्या हप्त्याच्या* 35% |
| 3rd | एकुण भरलेल्या हप्त्याच्या* 35% |
| 4th - 8th | एकुण भरलेल्या हप्त्याच्या* 50% |
| 9th | एकुण भरलेल्या हप्त्याच्या* 60% |
| 10th | एकुण भरलेल्या हप्त्याच्या* 70% |
| 11th | एकुण भरलेल्या हप्त्याच्या* 90% |
| 12th | एकुण भरलेल्या हप्त्याच्या* 90% |

एकुण भरलेले हप्ते म्हणजे सर्व मिळालेल्या हप्त्यांची एकुण बेरीज, वजा अतिरिक्त हप्ता, रायडर हप्ता आणि कर, काही असल्यास.

- **विशेष सरेंडर मूल्य:**

विशेष सरेंडर मूल्य इतके असेल.

विशेष सरेंडर मूल्य घटक x भरणा केलेली हमी रक्कम

IRDA ऑफ इंडियाच्या पूर्व मंजुरीने कंपनी विशेष सरेंडर मूल्य घटकाचा (SSV) वेळोवेळी आढावा घेऊ शकते.

## महत्त्वाचे नियम व अटी

**करलाभ**

करलाभ हे आयकर कायदा, 1961 मधील कलम 80C आणि 10(10(D)) नुसार असतील. कर लाभ हे चालू कर कायद्यांनुसार असतील आणि त्यात वेळोवेळी बदल होऊ शकतात.

**सवलत कालावधी**

''सवलत कालावधी'' म्हणजे हप्ता भरण्याच्या तारखेपासून कंपनीने, कोणताही दंड न आकारता किंवा विलंब शुल्क न आकारता दिलेला कालावधी ज्या दरम्यान पॉलिसीचे नियम व अटींनुसार कोणत्याही खंडाशिवाय जोखीम संरक्षणासह पॉलिसी कार्यान्वित आहे असे समजले जाते. हप्ता भरण्यासाठी सवलत कालावधी 30 दिवसांचा असेल.

**नामांकन आणि नेमणुक:**

विमा कायदा, 1938 मधील कलम 39, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, यात व्याख्या केल्यानुसार ह्या पॉलिसी अंतर्गत नामांकन करण्याची परवानगी आहे.

विमा कायदा, 1938 मधील कलम 38, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, यात व्याख्या केल्यानुसार ह्या पॉलिसी अंतर्गत नेमणुक करण्याची परवानगी आहे.

**कर्ज**

अविवा द्वारा ह्या पॉलिसी अंतर्गत कोणतेही कर्ज दिले जाणार नाही.

**मोफत पाहणी कालावधी**
पॉलिसीधारकाला पॉलिसीचे दस्तऐवज मिळाल्याच्या तारखेपासून 15 दिवसांचे आत (दूरस्थ विपणन पद्धतीने पॉलिसीची विनंती केली असल्यास 30 दिवस) पॉलिसीचे नियम व अटी यांचा आढावा घेण्याचा अधिकार आहे. पॉलिसीधारकाने मोफत पाहणी कालावधीत पॉलिसी रद्द केल्यास, कंपनीद्वारा वैद्यकीय तपासणीवर केलेला खर्च, काही असल्यास, त्या प्रमाणातील जोखमीचे शुल्क आणि मुद्रांक शुल्क वजा करुन रद्द केल्याच्या तारखेला हप्त्याची रक्कम परत करेल.

**आत्महत्येच्या दाव्याची तरतूद आणि वगळण्याचे मुद्दे (काही असल्यास)**

पॉलिसी अंतर्गत जोखीम सुरु झाल्याच्या तारखेपासून किंवा पॉलिसीच्या पुनरुज्जीवनाच्या तारखेपासून 12 महिन्यांचे आत, लागू असेल त्याप्रमाणे, विमित व्यक्तीचा आत्महत्येद्वारे मृत्यू झाल्यास, पॉलिसी कार्यान्वित असल्यास, पॉलिसीधारकाची नामनिर्देशित व्यक्ती किंवा लाभधारक हे मृत्यूच्या तारखेपर्यंत एकुण भरलेल्या हप्त्याच्या किमान 80% किंवा मृत्यूच्या तारखेला उपलब्ध असलेले सरेंडर मूल्य, ह्यापैकी जे अधिक असेल तितकी रक्कम मिळण्यास पात्र असेल.

## स्वीकृती

संपूर्ण जोखीम आणि हप्ताची रक्कम स्वीकारल्याशिवाय अविवा कोणत्याही दाव्यास जबाबदार नसेल.

## विमा कायदा 1938 मधील कलम 41

विमा कायदा 1938 मधील कलम 41 मधील तरतुदी, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, लागू असतील. चालू तरतुदींनुसार :

(1) कोणीही व्यक्ती भारतातील जीवन किंवा मालमत्ता ह्याच्याशी संबंधित जोखमींच्या संदर्भात विमा काढण्यासाठी किंवा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी किंवा तो सुरु ठेवण्यासाठी कोणाही व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणतेही आमिष देण्याची परवानगी देणार नाही किंवा परवानगी देऊ करणार नाही, देय कमीशनमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही हिस्यात किंवा पॉलिसीवर दर्शविण्यात आलेल्या हप्त्यात, कोणतीही सूट देऊ करणार नाही, किंवा पॉलिसी घेणारी, किंवा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरु ठेवणारी कोणीही व्यक्ती विमा कंपनीच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकानुसार किंवा तक्त्यानुसार परवानगी असलेल्या देण्यात येणाऱ्या सूट व्यतिरिक्त, कोणतीही सूट स्वीकारणार नाही.

(2) ह्या कलमाच्या तरतुदींची पूर्तता करण्याच्या बाबतीत कोणाही व्यक्तीने काही हलगर्जीपणा केल्यास, दंड आकारला जाईल जो रु. दहा लाख पर्यंत वाढविला जाऊ शकतो.

## विमा कायदा 1938 मधील कलम 45

विमा कायदा 1938 मधील कलम 45 मधील तरतुदी, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, ह्या कंत्राटाला लागू असतील.

## अविवाबद्दल

**अविवामध्ये गुंतवणूक का करावी?**

अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड ही डाबर इन्व्हेस्ट कॉर्पोरेशन आणि अविवा इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेड - यूके (UK) तील विमा कंपनी यांचा संयुक्त उपक्रम आहे ज्यांचा भारताशी 1834 पासून संबंध आहे. अविवा लाईफ इन्शूरन्सची निवड केल्यास तुम्हाला जगातील एका सर्वाधिक जुन्या विमा समुहाचा व्यवस्थापनाच्या अनुभवाचा लाभ मिळतो ज्यांना 1696 पासूनचा इतिहास आहे. 1884 साली स्थापन करण्यात आलेली डाबर इंडिया लिमिटेड ही डाबर समुहाची एक प्रमुख कंपनी आहे आणि भारतातील सर्वात जुनी व सर्वाधिक मोठ्या कंपन्यांपैकी एक कंपनी आहे. ही देशातील पारंपारिक आरोग्यसेवा उत्पादनाची एक अग्रणी उत्पादक कंपनी आहे.

**चौकशी आणि तक्रारी:**

अधिक माहिती, चौकशी आणि तक्रारीसाठी,
कृपया आमच्याशी खालील क्रमांकांवर संपर्क साधा:

1800-103-7766 (BSNL/MTNL ग्राहकांसाठी टोल फ्री) किंवा
0124-2709046 किंवा 5676737 वर "Aviva" SMS करा.
फॅक्स क्रमांक.: 0124- 2571210

AVIVA
| Life Insurance |

*डाबर इन्व्हेस्ट कॉर्पो. आणि*
*अविवा इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेड यांचा संयुक्त उपक्रम*


**अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड**

**मुख्य कार्यालय:** अविवा टॉवर, सेक्टर रोड, गोल्फ कोर्ससमोर,
DLF फेज-V, सेक्टर 43, गुरगाव-122003, हरयाणा, भारत.
फोन क्र.: +91 124-2709000, फॅक्स क्र.: +91 124-2571210

वेबसाईट: www.avivaindia.com
ई-मेल: customerservices@avivaindia.com

**नोंदणीकृत कार्यालय:** 2रा मजला, प्रकाशदीप बिल्डिंग,
7, टॉल्स्टॉय मार्ग, नवी दिल्ली-110001, भारत.

कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN): U66010DL2000PLC107880


खोटे फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा IRDA द्वारा जनतेस स्पष्टिकरण देण्यात आहे की : • IRDA किंवा त्यांचे अधिकारी कोणतीही विमा किंवा आर्थिक उत्पादनांच्या विक्रीत सहभागी होत नाहीत किंवा हप्त्याची गुंतवणूक करत नाहीत. • IRDA द्वारा कोणत्याही प्रकारच्या बोनसची घोषणा करण्यात येत नाही. अशा प्रकारचे कॉल्स स्वीकारणाऱ्या जनतेस दूरध्वनी क्रमांकाचा तपशिल, क्रमांक अशा माहितीच्या तपशिलासह त्या संबंधात पोलीसात तक्रार करण्याची विनंती करण्यात येत आहे.

अविवा न्यू फॅमिली इन्कम बिल्डर - ही एक व्यक्तिगत नॉन-लिंक्ड असहभागी बचत जीवन विमा योजना. वर प्रदर्शित करण्यात आलेले ट्रेड लोगोज हे अविवा ब्रँडस लिमिटेड यांचे आहेत आणि अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड द्वारा त्यांचा परवान्यांतर्गत उपयोग करण्यात येत आहे. कर लाभ हे चालू कर कायद्यांनुसार आहेत ज्यात बदल होऊ शकतात. अविवा न्यू फॅमिली इन्कम बिल्डर - ही एक व्यक्तिगत नॉन-लिंक्ड असहभागी बचत देणारी विमा योजना. IRDA ऑफ इंडिया नोंदणी क्रमांक: 122, UIN : 122N103V04, Advt. No.: Nov 38/19, MKT/Nov 2019/Ver.2.0